**ठळक बातम्या**

- आत्मनिर्भरतेवर भर देतानाच अनावश्यक परदेश दौरे आणि सोने खरेदी टाळण्याचं प्रधानमंत्र्यांचं देशवासियांना पुन्हा एकदा आवाहन

- येत्या शैक्षणिक वर्षापासून अंमली पदार्थ जनजागृतीचा शालेय अभ्यासक्रमात समावेश करायला राज्य मंत्रिमंडळाची मंजुरी

- नीट पेपरफुटी विरोधातल्या आंदोलनासंदर्भात देशभरात दाखल झालेले एफआयआर सर्वोच्च न्यायालयाकडून रद्द

आणि

- राज्यात यंदाच्या हंगामात आतापर्यंत सरासरीपेक्षा १३ टक्के कमी पाऊस

**<><><><><>**

देशाचा आर्थिकवृद्धी दर कायम ठेवायचा असेल तर आत्मनिर्भरतेवर भर द्यायला हवा असं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाज माध्यमांवरुन केलं आहे. स्वदेशी आणि आत्मनिर्भरतेवर अधिकाधिक भर दिला तर विकसित भारताचं स्वप्न २०४७ पर्यंत साध्य होऊ शकेल असं ते म्हणाले. जगभर अस्थिर वातावरण असताना भारतानं ७ पूर्णांक ८ दशांश टक्क्यांचा विकास दर साध्य केल्याबद्दल त्यांनी देशवासियांचं अभिनंदन केलं आणि परदेश दौरे टाळणे, सोने खरेदी टाळण्याचं आवाहन पुन्हा एकदा केलं.

- **- प्रधानमंत्री बाइट - -**

- **<><><><><>**

आगामी शैक्षणिक वर्षापासून शालेय शिक्षणात इयत्ता पाचवीपासून अमली पदार्थविरोधी जनजागृतीबद्दल किमान १ धडा समाविष्ट करायचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. सन २०२९पर्यंत राज्यातून अंमली पदार्थांचं समूळ उच्चाटन करण्यासाठी राज्य शासनाचं सर्वसमावेशक शासकीय दृष्टिकोन धोरणही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत जाहीर करण्यात आलं. शासनाच्या सर्व विभागांच्या सहभागातून ते राबवण्यात येणार असून ग्राम पातळीपासून ते जिल्हा, विभाग

आणि मंत्रालयीन स्तरापर्यंत जबाबदाऱ्यांचं वाटप करण्यात आलं आहे. शासकीय-निमशासकीय बैठका, कार्यक्रमांदरम्यान आणि उपहारगृहांमध्ये आरोग्यदायी अन्नपदार्थ ठेवण्याच्या धोरणालाही मंत्रिमंडळाची मंजुरी मिळाली. याअंतर्गत संतुलित अन्नपदार्थ ठेवणं बंधनकारक होणार आहे.

<><><><><>

भूमी प्रशासनासाठी राज्य शासनाच्या महसूल आणि वन विभागानं विकसित केलेल्या महाभूमी स्टॅक प्रणालीचा प्रारंभ आज राज्यमंत्रिमंडळ बैठकीनंतर करण्यात आला.

जमिनींच्या खरेदी-विक्री व्यवहारात आणि व्यवहारानंतर अनेक बाबतीत नागरिकांना महाभूलेख, महाभूनकाशा, आयडीआरएस यासारख्या विविध प्रणालींची मदत घ्यावी लागते. या सर्व विखुरलेल्या प्रणालींचं एकत्रीकरण करून दहा प्रमुख भूमी सेवा श्रेणींसाठी एकच एकात्मिक डिजिटल प्रवेशद्वार महाभूमी स्टॅकच्या माध्यमातून उपलब्ध करून दिलं आहे.

<><><><><>

महाराष्ट्र आणि कर्नाटकातल्या सीमावाद प्रकरणावर सर्वोच्च न्यायालयात तातडीनं सुनावणी घेतली जावी अशी मागणी महाराष्ट्रानं आज केली. या प्रकरणाची आपण तपासणी करू, मात्र सुनावणीची निश्चित तारीख देऊ शकत नाही, असं न्यायालयानं यावेळी सांगितलं.

<><><><><>

विद्यार्थी आंदोलनादरम्यान दिल्लीसह, महाराष्ट्र, बिहार, पश्चिम बंगाल आणि आसाम पोलिसांनी दाखल केलेले अनेक एफआयआर सर्वोच्च न्यायालयानं आज रद्द केले. हे एफआयआर रद्द करावेत, असे अर्ज केंद्र सरकार आणि संबंधित राज्य सरकारांनी केल्यानंतर कलम १४२ अंतर्गत सर्वोच्च न्यायालयानं विशेषाधिकाराचा वापर करून हा निर्णय घेतला. याशिवाय इतर राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये दाखल केलेल्या एफआयआरचा तपास करू नये, अर्थात ही प्रकरणं रद्द समजावीत, असंही पीठानं स्पष्ट केलं. २० ते २५ जुलै यादरम्यान झालेल्या आंदोलनांशी संबंधित कोणताही नवा एफआयआर नोंदवून घेऊ नये, असंही पीठानं सांगितलं. गंभीर गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या २ हजार ८७३ जणांवरची कारवाई सुरूच ठेवू, अशी भूमिका सरकारनं मांडली. या सर्वांच्या विरोधात नव्याने एकच एफआयआर नोंदवायची परवानगी सर्वोच्च न्यायालयानं दिल्ली पोलिसांना दिली. या पार्श्वभूमीवर, कॉकरोच जनता

पार्टीनं ५ सप्टेंबरचा दिल्लीतला प्रस्तावित मोर्चा रद्द केल्याची घोषणा केली आहे. सरकारनं या भूमिकेचं स्वागत केलं.

**<><><><><>**

साखरेच्या घाऊक व्यापारांना १५ तारखेपासून जास्तीत जास्त २ हजार क्विंटल साखरेचा साठा करता येणार आहे. पुरेशा प्रमाणात साखरेची उपलब्धता, साठेबाजी टाळणे आणि किंमती मर्यादित ठेवण्यासाठी केंद्र सरकारनं आज या निर्बंधांची घोषणा केली. सध्या ही मर्यादा ४ हजार क्विंटल आहे.  १५ सप्टेंबर ते ३० नोव्हेंबर या कालावधीत ही नवी मर्यादा लागू असेल.

**<><><><><>**

निवडणूक आयोगानं SIR अर्थात विशेष सखोल पुनरीक्षणानंतर प्रारुप मतदार यादी काल प्रसिद्ध केली. त्यात २ कोटी ६ लाख ८८ हजारांहून अधिक नाव वगळली आहेत. राज्यातल्या एकूण १२ मतदारसंघामधून प्रत्येकी २ लाखांहून अधिक नाव वगळण्यात आली आहेत. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून..

- **- - होल्ड व्हाइस कास्ट - - -**

*(पुणे, ठाणे, मुंबई उपनगर, नागपूर, नाशिक या जिल्ह्यातून सर्वाधिक तर सिंधुदुर्ग, हिंगोली आणि गडचिरोलीतून सर्वात कमी मतदारांची नावं वगळली आहेत. मतदारसंघानुसार विरार नालासोपारा विधानसभा मतदार संघातून सर्वाधिक ३ लाख ६ हजार ८५१ मतदारांची नावं वगळली आहेत. यापैकी अडीच लाखांहून अधिक सापडत नसल्याचं निवडणूक आयोगानं म्हटलं आहे. हडपसर मतदार संघातून २ लाख ९८ हजार ३७२ तर पनवेल विधानसभा मतदार संघातून २ लाख ८३ हजाराहून अधिक नाव वगळली आहेत. खडकवासला, चिंचवड, कल्याण ग्रामीण, ओवळा माजीवडा, ऐरोली, मुंब्रा-कळवा, मीरा भाईंदर, कोथरूड आणि वडगाव शेरी या मतदारसंघातून २ लाखाहून अधिक नाव वगळली आहेत.  सर्वाधिक स्थलांतरांची नोंद पनवेल, पर्वती, मीरा भाईंदर या विधानसभा मतदारसंघांमधे झाली आहे. नागपूर मध्य, नागपूर उत्तर, कसबा पेठ, बडनेरा, नागपूर नैऋत्य, सांगली, नागपूर, कामठी, पंढरपूर, हिंगणा, नागपूर पश्चिम या विधानसभा मतदारसंघात निधनामुळं प्रत्येकी २० हजारांहून अधिक मतदारांची नाव वगळली आहेत.*

*राज्यातल्या ६३ मतदारसंघातल्या १ लाखाहून अधिक मतदारांची नाव प्रारुप मतदार यादीत नाहीत. अकोले, राजापूर, चिमूर, जळगाव जामोद, खामगाव, मेहकर, गुहागर या मतदारसंघांमधून प्रत्येकी २० हजारापेक्षा कमी मतदारांची नाव वगळली आहेत.*

*मतदारांना ceo.maharashtra.gov.in या, राज्याच्या मुख्य निवडणूक कार्यालयाच्या संकेतस्थळावर जाऊन मतदारांना या प्रारूप यादीत आपलं नाव आहे किंवा नाही, हे तपासून बघता येईल. मतदार ओळखपत्रावर असलेला एपिक क्रमांक, मतदार नोंदणीचे तपशील किंवा मोबाइल नंबर असे ३ पर्याय यासाठी वापरता येतील. मतदार यादीतून नाव वगळलेल्या मतदारांना ३० सप्टेंबरपर्यंत दावे आणि हरकती दाखल करता येणार आहेत. त्यासाठी प्रपत्र ६ मध्ये घोषणापत्रासह भरावं लागेल. सगळी कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर अंतिम मतदारयादी ४ नोव्हेंबरला प्रसिद्ध होणार आहे.)*

<><><><><>

MPSC अर्थात महाराष्ट्र लोकसेवा आयोग च्या औषध निरीक्षक पदासाठीच्या पेपरफुटी प्रकरणातली आरोपी ऋतुजा पाटील हिला मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेनं आज नंदुरबार इथून अटक केली. फुटलेल्या २९४ प्रश्नांपैकी ७७ प्रश्न हे प्रत्यक्ष प्रश्नपत्रिकेतले होते, असं तपासादरम्यान समोर आलं होतं. तसंच, सगळ्या प्रश्नांची उत्तरं बरोबर आल्यामुळे संशय येऊ नये, यासाठी मुद्दाम १० उत्तरं चुकवण्याचा सल्ला आरोपीनं ऋतुजाला दिल्याचं पोलिसांनी सांगितलं होतं.

MPSCच्या ३ अधिकाऱ्यांसह एकंदर ६ जणांना पोलिसांनी गेल्या बुधवारी अटक केली होती.

<><><><><>

राज्यात यंदाच्या हंगामात आतापर्यंत सरासरीपेक्षा १३ टक्के कमी पाऊस पडल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे. राज्यात पावसाळ्यात सरासरी प्रमाण ८२२ पूर्णांक २ दशांश मिलिमीटर पाऊस पडतो, मात्र यंदा ७१८ पूर्णांक ५ दशांश मिलीमीटर पाऊस झाला. विदर्भ आणि मराठवाड्यातल्या बहुतांश जिल्ह्यांमध्ये सरासरीपेक्षा कमी, तर उत्तर महाराष्ट्र, कोकण, मध्य महाराष्ट्र आणि पश्चिम महाराष्ट्रातल्या बहुतेक जिल्ह्यांमध्ये सरासरीइतक्या, किंवा जास्त पावसाची नोंद झाली आहे. मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, रायगड, रत्नागिरी, कोल्हापूर, सांगली, धुळे, जळगांव, बुलढाणा, छत्रपती संभाजीनगर, भंडारा आणि गोंदिया या

१३ जिल्ह्यांमध्ये सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडला, तर पालघर, नाशिक, पुणे आणि सातारा या ४ जिल्ह्यांमध्ये सरासरीइतका पाऊस नोंदवला गेला. उर्वरित १९ जिल्ह्यांमध्ये सरासरीपेक्षा कमी पाऊस झाला.

<><><><><>

आगामी रणजी करंडक हंगामासाठी मुंबई क्रिकेट संघाच्या कर्णधारपदी शार्दुल ठाकूरच्या जागी फलंदाज सिद्धेश लाड याची निवड झाली आहे. मर्यादित षटकांच्या देशांतर्गत स्पर्धांमध्ये, उपलब्धतेनुसार, श्रेयस अय्यर किंवा सूर्यकुमार यादव यांच्यापैकी एक जण संघाचं नेतृत्व करेल.

//<><><><><>//